नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १६८ Issue - 168 | वार मंगळवार दि. ५ नोव्हेंबर २०२४ Blow- Tuesday Date 5 November 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## बस दरीत कोसळून ३६ प्रवाशांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

डेहराडून : उत्तराखंडच्या अल्मोडा येथे प्रवाशांनी भरलेल्या बसला भीषण अपघात झाला आहे. मार्चुला परिसरात प्रवाशांनी भरलेली बस दरीत पडून हा भीषण अपघात झाला. यावेळी बसमधून ४० जण प्रवास करत असल्याची माहिती आहे. या अपघ–तात आतापर्यंत ३६ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. घटनेनंतर एसएसपी अल्मोडा हे घटनास्थळी पोहोचले. बचावकार्यासाठी तीन पथक तयार करण्यात आले आहेत.



याप्रकरणी एसडीएम संजय कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, काही लोक जखमी झाले आहेत. जखमींना जवळच्या रुग्णालयात पाठवण्यात येत आहे. अल्मोडा पोलीस ठाण्याच्या सॉल्ट मर्चुला परिसरात हा अपघात घडला आहे.

बस खोल दरीत कोसळून सुमारे ३६ जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले. एजन्सीने दिलेल्या माहितीनुसार एका वरिष्ठ अधिकाऱ्याने ही माहिती दिली आहे. जिल्हा दंडाधिकारी आलोक कुमार पांडे यांनी सांगितले की, बस गढवालहून कुम ाऊंकडे जात असताना अल्मोडा येथील मर्चुलामध्ये हा अपघात झाला. बसम ध्ये ४० प्रवासी होते, त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे, असंही पांडे यांनी सांगितले. शोध आणि बचाव कार्य सुरू करण्यासाठी पोलीस आणि एसडीआरएफचे जवान घटनास्थळी पोहोचले आहेत.

मुख्यमंत्र्यांकडून सोशल मीडियावर शोक व्यक्त

या दुर्घटनेबाबत उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी शोक व्यक्त केला आहे. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत म्हटलं की, अल्मोडा जिल्ह्यातील मर्चुला येथे झालेल्या दुर्दैवी बस अपघाताताची अत्यंत दुःखद बातमी मिळाली. जिल्हा प्रशासनाला जलद मदत आणि बचाव कार्य करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. घटनास्थळी स्थानिक प्रशासन आणि एसडीआरएफ टीम जखमींना बाहेर काढण्यासाठी आणि त्यांना उपचारासाठी जवळच्या आरोग्य केंद्रात नेण्यासाठी जलद गतीने काम करत आहेत. गरज भासल्यास गंभीर जखमी प्रवाशांना एअरलिफ्ट करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

## मुंबई पोलिस आयुक्त विवेक फणसळकर यांच्याकडे महासंचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : निवडणूक आयोगाच्या आदेशानंतर पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली करण्यात आल्यानंतर पोलीस महासंचालक पदाचा तात्पुरता कारभार मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. पुढील आदेश येईपर्यंत पोलीस महासंचालकपदाचा अतिरिक्त कार्यभार हा फणसाळकर यांच्याकडे असणार आहे.

भारतीय पोलीस सेवेच्या १९८९ तुकडीतील अधिकारी असलेले फणसळकर हे पोलीस महासंचालक दर्जाचे अधिकारी आहेत. मुंबई पोलीस दलातील सुमारे ५० हजार पोलिसांचे ते नेतृत्व करत आहेत. फणसळकर त्यापूर्वी म हाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिम र्ाण व कल्याण महामंडळ, मुंबईच्या व्यवस्थापकीय संचालक पदावर ते कार्यरत होते. त्या आधी फणसळकर ठाण्याच्या पोलीस आयुक्तपदी कार्यरत होते. सुमारे पावणेदोन वर्षे त्यांनी ठाणे शहर आयुक्तपदाचा कार्यभार सांभळला. करोना काळात जिवाची बाजी लावून जनतेचा जीव वाचण्याऱ्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी त्यांनी पुढाकार घेतला होता.



याशिवाय त्यांनी मुंबईतही महत्त्वाच्या पदांवर यापूर्वी काम केले आहे. मुंबईच्या वाह–तूक विभागाचे सहआयुक्त म्हणून फणसळकर यांनी काम केले होते. मुंबईत पो–लीस सहआयुक्त (प्रशासन) या पदाचाही कार्यभारही त्यांनी सांभाळला आहे. फणसळकर यांची पहिली नियुक्ती अकोल्याचे अतिरिक्त अधीक्षक म्हणून झाली होती. त्यानंतर त्यांनी वर्ध्याचे व परभणीचे पोलीस अधीक्षक म्हणून काम केले. नाशिकचे उपायुक्त ही त्यांची आयुक्तालयातील पहिली नियुक्ती होती. त्यानंतर, दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख म्हणूनही त्यांनी कार्यभार सांभाळला होता.

## निवडणूक लढवणार नाही : जरांगे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मराठा समाज बांधवांशी आम्ही बरीच चर्चा केली. चर्चा करेपर्यंत पहाटे तीन वाजले. मित्रपक्षांची यादी येणार होती, यादी आली नाही. एका जातीवर लढणं शक्य नाही. अजू–नही मित्रपक्षांची यादी आलेली नाही. नाईलाजाने आपण थांबलेलं बरं. आता पाडापाडी करावी ला–गेल. आपण १३–१४ महिने राजकारण पाहतोय फक्त. त्यामुळे आपल्याला निवडणूक लढायची नाही अशी घोषणा मनोज जरांगेंनी केली आहे. आपले अर्ज, मागे घ्या ही सगळ्यांना विनंती करतो आहे. आपली उगाच फसगत होईल. आपलं आंदोलन सुरुच आहे. निवडणूक झाली की आपण पुन्हा आपला लढा देऊ. एका जातीवर निवडणूक लढवणं शक्य नाही. एका जातीवर जिंकता येणार नाही. मित्रपक्षांनी यादी पाठवलेली नाही. त्यामुळे आम्ही निवडणूक लढवणार नाही असं मनोज जरांगेंनी जाहीर केली आहे. मनोज जरांगे म्हणाले, आम्ही मित्रपक्षांसह चर्चा करत होतो, लढणार होतो. आमचे मतदारसंघही ठरले होते. आम्ही समाजाशी चर्चा केली. मित्र पक्षांनी यादी दिलेली नाही. मी तर कुणाला पाडही म्हणत नाही आणि निवडून आण हे पण हे सांगणार नाही. आता जर कुणी माझ्या आंदोलनात आलं तर मात्र मी कार्यक्रम करणार. म राठा समाज जर का एकटा लढला, तर निवडून येणार नाही. माझा सम ाज खूप वेदनेतून गेला आहे. मी एवढंच सांगेन की ज्याला कुणाला पाडायचं त्याला पाडा निवडून आणायचं त्यांना आणा.



## संपादकीय....

### भारताकडून निषेध

कॅनडामध्ये ब्रॅम्प्टनमधील हिंदू मंदिराबाहेर रविवारी खलिस्तानी निदर्शक आणि हिंदू धर्मीयांमध्ये संघर्ष उडाला. भारताच्या उच्चायुक्तालयाने हिंदू सभा मंदिराबरोबर संयुक्तपणे आयोजित केलेल्या कार्यक्रमादरम्यान ही घटना घडली. भारतीय उच्चायुक्तालय तसेच कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनी या घटनेचा निषेध केला असून परराष्ट्र मंत्रालयानेही दखल घेतली आहे. ओटावा उच्चायुक्तालय आणि व्हॅनकूव्हर, टोरांटो येथील महावाणिज्य दूतावासांनी संयुक्तपणे छावणी उभारली होती. 'लोकल लाइफ सर्टिफिकेट' लाभार्थ्यांच्या सोयीसाठी हिंदू सभा मंदिराबरोबर एका कार्यक्रमाचे आयोजन केले गेले होते. या वेळी नियोजित हिंसक कृती करण्यात आल्याचा आरोप उच्चायुक्तालयाने केला.गोंधळानंतरही उच्चायुक्तालयाने एक हजाराहून अधिक लोकल लाइफ सर्टिफिकेट भारत आणि कॅनडामधील नागरिकांना दिल्याचे अधिकाऱ्यांनी नमूद केले. समाजमाध्यमांत खलिस्तानला समर्थन देणारे फलक आंदोलकांनी हातात घेतले होते. त्यांची पडताळणी करणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. भारत आणि कॅनडा यांच्यात गेल्या काही दिवसांपासून तणावाचे संबंध निर्माण झाले आहेत. खलिस्तानी अतिरेकी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येमध्ये भारतीय गुप्तचर यंत्रणांचा हात असल्याचा आरोप कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी सप्टेंबर महिन्यात केला होता. हा आरोप करताना त्यांनी याबाबत ठोस असे पुरावे सादर केले नव्हते. भारताने त्यांच्या आरोपाचे जोरदार खंडन केले. या आरोपानंतर भारताने कॅनडातील सहा राजनैतिक अधिकाऱ्यांना माघारी बोलावून घेतले. तसेच कॅनडाच्या भारतातील राजनैतिक अधिकाऱ्यांना देश सोडण्याच्या सूचना देण्यात आली. कॅनडाच्या ब्रेम्प्टन भागात रविवारी (४ नोव्हेंबर) हिंदू मंदिरावर खलिस्तानवाद्यांनी हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेवर संताप व्यक्त होत असताना आता पंतप्रधान मोदींनीही याचा निषेध व्यक्त केला आहे. भारतीय उच्चाधिकारी मंदिराला भेट देण्यासाठी आले असताना सदर हल्ला करण्यात आला होता. पंतप्रधान मोदींनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले, हिंदू मंदिरांवर जाणीवपूर्वक हल्ला केलेला असून राजनैतिक अधिकाऱ्यांना एकप्रकारे धमकाविण्याचा भ्याड प्रयत्न यातून झालेला आहे. या हल्ल्यानंतर आता कॅनडाने कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती सांभाळण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे. कॅनडातील खलिस्तानवाद्यांविरोधात भारत ठामपणे उभा असल्याचा संदेश यानिमित्ताने दिला गेला आहे.

# विधानसभा निवडणुकीला प्राधान्य देऊन सर्व प्रक्रिया यशस्वी रित्या पार पाडा : नरेश झा

**दैनिक यश सिध्दी न्युज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी /राहुल साबळे

मा. केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करीता निवडणूक कार्यक्रम घोषित केला असून दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे त्या अनुषंगाने २४ - सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघातील सर्व झोनल अधिकारी तसेच सर्व कर्मचारी यांची आज दिनांक ०४ नोव्हेंबर २०२४ रोजी आढावा बैठक पंचायत समिती सभागृह सिंदखेडराजा येथे मा.सामान्य निवडणूक निरीक्षक नरेश झा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

**नरेश झा यांनी आचारसंहितेचे पालन करताना कोण कोणत्या गोष्टींची काळजी घ्यायची याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले, सर्व निवडणुकीतील कर्मचारी / अधिकाऱ्यांकडून कोणतीही चूक होऊ नये याची दक्षता घेण्याचे सुद्धा सर्वांना आवाहन केले तसेच आचारसंहितेचे पालन करून योग्य प्रकारे आपापली कामे कशी करावी यासाठी मार्गदर्शन केले. विधानसभा निवडणुकीला प्राधान्य देऊन सर्व प्रक्रिया यशस्वी रित्या पार पाडण्याचे आवाहन केले.**

आजच्या बैठकीमध्ये नरेश झा यांनी विधानसभा निवडणुकीच्या सर्व बाबींचा आढावा बैठकीमध्ये घेतला. प्रत्येक झोनल अधिकाऱ्यांनी आपापली जबाबदारी योग्यरीत्या पार पाडून, विधानसभा निवडणुकीला प्राधान्य देऊन प्रक्रिया पूर्ण करावी यासाठी जमलेल्या सर्व अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच विधानसभा निवडणूक २०२४ ही यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी सर्व अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी आपापली जबाबदारी योग्यरीत्या पार पाडावी असे नरेश झा यांनी सर्वांना आवाहन केले.

निवडणूकिसाठी लागणारे साहित्य तसेच पोलिंग बूथ वर लागणारे साहित्य या सर्वांचा आढावा घेऊन कोणतेही साहित्य कमी पडणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना संबंधित सेल च्या अधिकारी यांना करण्यात आल्या.

दुपारी ३ वाजता निवडणूक विभाग तहसील कार्यालय येथे मा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व उमेदवारांना निवडणूक चिन्ह वाटप करण्यात आले, यासाठी उमेदवार तसेच त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

दुपारी ४ वाजता मा.सामान्य निवडणूक निरीक्षक नरेश झा सरांच्या मार्गदर्शनाखाली सर्व उमेदवारांना निवडणूक प्रक्रियेच्या सर्व बाबींची माहिती देऊन मार्गदर्शन करण्यात आले. मा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांनी सर्व उपस्थित उमेदवारांना ईव्हीएम मशीची तोंड ओळख करून दिली तसेच बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट, ततझढ मशीन हे कशाप्रकारे काम करते याबद्दल उपस्थित उमेदवारांना मार्गदर्शन केले.

मा. निवडणूक निर्णय अधिकारी प्राध्यापक संजय खडसे यांनी सर्व उमेदवारांना आज पासून ते मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत काय करायला पाहिजे याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. मा. निवडणूक आयोगाने प्रत्येक




उमेदवाराला ४० लाख रुपये पर्यंत खर्च करण्याची मुभा दिलेली आहे, उमेदवारांनी त्यांनी केलेल्या खर्चाचा हिशोब ठेवण्याकरिता त्यांना नोंदवही देण्यात आलेली आहे आणि या सर्व खर्चाचा ताळेबंद घेण्यासाठी लेखा विभागाच्या अधिकाऱ्यांचे पथक यावर काम करत आहे.मा.निवडणूक खर्च निरीक्षक दानिश अब्दुल्ला हे दर तीन दिवसांनी या सर्व उमेदवारांच्या खर्चाचा आढावा घेतील.

बैठकीला तहसीलदार सिंदखेड राजा अजित दिवटे ,तहसीलदार देऊळगाव राजा वैशाली डोंगरजाळ, गटविकास अधिकारी देऊळगाव राजा मुकेश माहोर ,सामान्य निरीक्षक यांचे सहायक श्री ढगे, निवडणूक नायब तहसीलदार सिंदखेडराजा मनोज सातव , निवडणूक नायब तहसीलदार देऊळगावराजा प्रवीण घोटकर, नायब तहसीलदार सिंदखेडराजा अस्मा मुजावर, नायब तहसीलदार सिंदखेडराजा प्रवीणकुमार वराडे, नायब तहसीलदार देऊळगाव राजा सायली जाधव,नायब तहसीलदार देऊळगाव राजा प्रांजल पवार, प्र. नायब तहसीलदार नितीन बढे, एतच् नोडल अधिकारी उद्धव मांटे, प्रसार माध्यम नोडल अधिकारी अंकुश म्हस्के, तसेच इतर अधिकारी उपस्थित होते.



# महालिंगराया यात्रा बुधवार पासून प्रारंभ

**दैनिक यश सिध्दी न्युज नेटवर्क**

उमरगा/ प्रतिनिधी : उमरगा तालुक्यातील महालिंगरायवाडी येथील जागृत देवस्थान महालिंगराया देवाची यात्रा बुधवार दि.६ते ७नोव्हेंबर रोजी संपन्न होणार आहे. याची नोंद भावी भक्ताने घ्यावी. अनेक वर्षाची परंपरा या यात्रा महोत्सवाची आहे.अनेक भाविक मनोभावे पूजा करण्यासाठी देवाच्या चरणाशी लीन होतात.आजूबाजूच्या परिसरातील तसेच मुंबई,पुणे, तसेच महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून हजारो भावीक भक्तांची रीघ या यात्रेनिमित्त होत असते.

महालिंगराया देवाची आख्यायिका -श्री. महालिंगराया यांचे नातू श्री. गुरुदेव समाधी अवस्थेत असताना त्यांचा दात पाच हात लांब जाऊन वारुळात पडलेला त्यांचा मुख्य शिष्य माळगोंडा यांनी ते पाहिले त्याचे विवरण गुरु देवाकडे केले हा चमत्कार कसा यावर गुरुदेवाने सांगितले.माझ्या दाताचे रूपांतर स्वयंभू पिंडित होईल ती पिंड म्हणजे माझे आजोबा श्री महालिंगराया असतील.तेथे यथाकाल भक्तगण महालिंगरायाचे मंदिर बांधतील त्यांच्याच नावाने महालिंगराया हे गाव वसले. व त्यांची दिवंगत कीर्ती महाराष्ट्रभर पसरेल.भक्तगण व परिसरातील भावीभक्त यांना त्यांचा आधार होईल.जे कोणी मनोभावे महालिंगराया देवाची पूजा करतील.त्याची इच्छा पूर्ण होईल. अशी आख्यायिका सांगितली जाते.तरी या जागृत देवस्थानाच्या यात्रेनिमित्त महाराष्ट्रातील भक्तांनी येऊन दर्शनाचा लाभ घ्यावा. तसेच बुधवारी दि.६ रोजी नैवेद्य,रात्री-देवाचा छबिना निघेल व गुरुवारी दि.७नोव्हेंबर रोजी दुपारी कुस्त्या संपन्न होतील.असे आव्हान महालिंगराया देवस्थान कमिटीचे अध्यक्षअण्णाराव घोरपडे,उपाध्यक्ष पुरुषोत्तमजाधव,सचिव प्रवीण जाधव,सदस्य- सुधाकर जाधव,श्री. श्रीकांत भुरे,धनाजीजाधव,संतोष घोरपडे,गोविंद भुसार, सर्जेराव घोरपडे,कैलास घोरपडे, महादेव दळवे,संतोष घाडगे,ज्ञानेश्वर चव्हाण,पवन घोरपडे,संदीप वागदरे,गोविंद सोनकटाळे यांनी केले आहे. या यात्रा महोत्सवामध्ये संपूर्ण गावातील तसेच महाराष्ट्रभरातील भावीक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# कल्याण येथे सामुदायिक वर्षावास मोठ्या उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समिती. आंबेडकर व्हिजन यांच्या वतीने आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा, सामुदायिक वर्षावास बालाजी लॉन्स, निक्की नगर, गांधारी, कल्याण (प) येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

श्रावस्ती बुध्दविहार, बारावे गाव, चंद्रेस गॅलेक्सी, गंधारी, रितु रिवर, रोनक सिटी, व अन्य विभागातील धम्म अनुयायी यानी आदरणीय भन्तेजी राहुल बोधी थेरो यांच्या उपस्थितीत प्रत्येक मंगळवार, शुक्रवार वर्षावास नियमित केला त्या निमित्ताने वर्षावास समाप्ती समारोह रविवार दि.२७ ऑक्टोंबर २०२४ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी श्रावस्ती बुध्द विहार बारावे गांव, माधव सृष्टी, आग्रेसेन चौक, कस्तुरी पार्क, निक्की नगर, बालाजी लॉन्स कल्याण प. येथून धम्म रॅली काढण्यात आली होती. भंतेजींना कठिण चिवरदान करण्यात आले.



भन्तेंनी उपस्थितांना त्रिशरण-पंचशील दिले भन्तेंनी कसिभारव्दाज सुत्ताचे पठन केले. जाति,जरा,व्याधी, मृत्यू यावर प्रकाश टाकला. खमायाचना या पाली शब्दांचे अर्थ स्पष्ट केले.समाज आणि भिक्खु यांचे नाते कसे आहे? हे अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केले. काया,वाचा,चित्त हे दरवाजे आहेत,ते आपण बंद ठेवायचे की उघडे ठेवायचे हे आपल्यावर आहे.आपले पुण्य हे निब्बाणापर्यंत आहे. त्यासाठी सोतापन्न,सगदागामी,अनागामी,अर्हंत या पायऱ्या ओलांडाव्या लागतात.बुद्धांचा धम्म हा मज्झिमा पटिपदा आहे.गंगेत आंघोळ करून कोणीच पवित्र होत नाही.हे उदाहरणे भन्ते राहुल बोधी थेरो यांनी दिली. तर भन्ते विनय बोधी महाथेरो यांनी मार्गदर्शन केले . सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हेमंत जाधव, सुभाष जाधव, नंदिनीताई साळवे. वसंत कदम यांनी मेहनत घेतली.

# मंगळवेढा येथे मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची जाहीर सभा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील मनसेच्या उमेदवार दिलीप धोत्रे यांच्या प्रचारार्थ महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे बुधवारी दिनांक ६ नोव्हेंबर रोजी मंगळवेढा येणार असून त्यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले की माहिती मनसेचे उमेदवार दिलीप धोत्रे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील अधिकृत उमेदवार दिलीप धोत्रे यांनी प्रचारात आघाडी घेतली असून महाराष्ट्रात सर्वात अगोदर त्यांची उमेदवारी जाहीर झाली आहे त्यांच्या प्रचारार्थ सायंकाळी सहा वाजता मंगळा शहरातील शिवप्रेमी चौक येथील आठवडा बाजार येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

पंढरपूर मध्ये अनेक वर्षापासून एम आयडीसी चा प्रश्न प्रलंबित आहे या ठिकाणी राज ठाकरे यांच्या माध्यमातून देशातील मोठे उद्योगपती यांच्यामार्फत उद्योग उभारून तरुण-तरुणीच्या हाताला काम देण्याचे काम करणार आहे मंगळवेढा येथे शहरात बसवेश्वर यांचा भव्य असा पुतळा उभारण्यासाठी अभिवचन देत आहे त्या मतदारसंघात सर्वांगीण विकास करण्यासाठी माझी उमेदवारी असल्याची त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

गेले दीड महिना त्यांनी प्रचाराचा धडाका लावला लावला असून आणि पंढरपूर मंगळवेढा तालुक्यातील सर्व गावे भिजून काढण्यात आले असून त्यांच्या सभांना प्रचंड मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे अनेक गावातील सभांना त्यांच्या प्रचंड गर्दी होत असून विविध पक्षाचे गटाची कार्यकर्ते महाराष्ट्र निर्माण सेनेचे लोकांमध्ये उमेद प्रकार आहेत त्यामुळे मतदारसंघातील वातावरण मनसेचे झाले असून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कार्यकर्ते गाठीपेटी जाऊन प्रचार करीत आहेत पंढरपूर

मंगळवेढा मतदारसंघातील सर्व प्रश्न मार्गी लावण्याचे काम आपण करणार असल्याचे अडचणी वर मात करून चर्चा करत आहे. मनसेचे उमेदवार दिलीप धोत्रे यांच्या प्रचाराची एक फेरी पूर्ण झाली आहे महाराष्ट्र निर्मला सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर प्रचारात सुरुवात केली असून पहिल्या टप्प्यात पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील उमेदवारांची सभा घेत आहे त्यामुळे त्यांच्याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागलेली आहे.

## ६ नोव्हेंबर पासून प्लॉट नोंदणी सुरु

## प्रांताधिकारी सचिन इथापे यांची माहिती

# कार्तिकी यात्रा सोहळा; पालखी सोहळा, दिंडीधारकांनी आगाऊ प्लॉटसची मागणी नोंदवावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कार्तिकी यात्रा एकादशीचा मुख्य सोहळा दि. १२ नोव्हेंबर २०२४ रोजी साजरा होत आहे. कार्तिकी यात्रेत येणाऱ्या शेकडो दिंड्यांना वास्तव्यासाठी भक्तीसागर (६५ एकर) येथे जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या ठिकाणी मोफत प्लॉटस भाविकांना तंबू, राहुट्या उभारुन वास्तव्य करण्यासाठी देण्यात येत आहेत. प्रथम येणाऱ्या पालखी, दिंडी धारकांना प्रथम प्राधान्य देण्यात येणार असून, दि.०६ नोव्हेंबर पासून प्लॉट नोंदणी सुरु करण्यात येणार आहे. संबधितांनी आगाऊ प्लॉटची मागणी नोंदवावी, असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आले आहे.

कार्तिकी यात्रेला येणाऱ्या पालख्या, दिंड्यांमधील भाविकांच्या निवाऱ्याची सोय भक्तीसागर (६५ एकर) येथे करण्यात आलेली आहे. या ठिकाणी भाविकांना निवाऱ्यासोबत पिण्याचे शुद्ध पाणी, शौचालय, वीज कनेक्शन, अन्नपदार्थ शिजवण्यासाठी गॅस वितरण, पोलीस संरक्षण, प्रथमोपचार केंद्र आदी सुविधा या ठिकाणी दिल्या जातात. त्यामुळे या ठिकाणी भाविकांची प्रचंड गर्दी होते. या ठिकाणी एकूण ४९७ प्लॉट्स असून त्यापैकी वापरायोग्य ४५० प्लॉटस आहेत. हे प्लॉटस भाविकांना निवाऱ्यासाठी दिले जातात. या ठिकाणी भाविकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आपत्कालीन मदत केंद्र स्थापन करण्यात येते. येथे प्रशासकीय यंत्रणा सुसज्ज व सुरळीतपणे काम करण्यासाठी नायब तहसिलदार सुधाकर धाईंजे यांची सेक्टर मॅनेजर म्हणून म्हणून नियुक्ती केली आहे.भाविकांना प्लॉटस वाटप करणे, अडीअडचणी सोडवणे, आपत्कालीन प्रतिसाद केंद्र व त्यावर नियुक्त सेक्टर मॅनेजर व त्याचे अधिनस्त कर्मचारी कार्यान्वित असणार आहेत.

दिंडी, पालखी समवेत येणाऱ्या भाविकांना भक्तीसागर ६५ एकर येथे प्लॉटसचे वाटप करण्यात येणार आहे. कार्तिकी एकदशीच्या सोहळ्या अगोदर दिंडी, पालखीतील भाविकांने प्लॉटसाठी मागणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रथम येणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. या ठिकाणी भाविकांना मुलभूत सेवासुविधा पुरवण्यात येणार असून आपत्कालीन प्रतिसाद केंद्रातून भाविकांना सेवा देण्यात येणार आहे. यासाठी नायब तहसिलदार सुधाकर धाईंजे (मो.क्र.९७६७२४८२१०), तसेच सहाय्यक बी.ए वागज (मो.क्र. ७७५६०१२५७८) व प्रमोद खंडागळे (मो.क्र. ९६५७२९०४०३) यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहनही प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# तुळजापूर विधानसभा मतदारसंघातिल महाविकास आघाडीतील बंड शमले; माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी उमेदवारी अर्ज घेतला मागे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनिधी (एस. के.गायकवाड) : तुळजापूर विधानसभा मतदारसंघातिल महाविकास आघाडीतील बंड खोरी थांबविण्यात काँग्रेस पक्षाला यश आले असून माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी आपक्ष म्हणून भरलेला आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे.

राष्ट्रीय काँग्रेस पक्ष श्रेष्ठींनी तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार तथा माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांना तिकीट नाकारल्याने नाराज झालेल्या मधुकरराव चव्हाण यांनी कार्यकर्ते यांच्या आग्रहाखातर प्रचंड शक्ती प्रदर्शन करीत तुळजापूर विधानसभा



मतदारसंघातून अपक्ष म्हणून आपला उमेदवारी अर्ज दाखल करून महाविकास आघाडीत मोठी बंडखोरी केली होती. परंतू उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या तारखेला दि.४ ऑक्टोबर २०२४ रोजी पक्षासी एकनिष्ठ राहत अखेर आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्यामुळे तुळजापूर विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीतील मोठी बंडखोरी शमली असून महाविकास आघाडीचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार कुलदीप उर्फ धिरज आप्पासाहेब पाटील यांची अडचण दूर झाली आहे.मधुकरराव चव्हाण यांच्या उमेदवारीमुळे पक्ष निष्ठा आणि व्यक्ती निष्ठा यांच्या कचाट्यात सापडलेले निष्ठावंत कार्यकर्ते यांना आता मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे आता तुळजापूर विधानसभा मतदारसंघांत महायुतीचे भाजपचे उमेदवार राणाजगजितसिंह पाटील विरूद्ध महाविकास आघाडीचे काँग्रेस पक्षाचे धिरज पाटील अर्थात पाटील विरूद्ध पाटील असा सामना रंगणार असी चर्चा होत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### मॉर्निंग वॉकला गेल्यावर घरातून मोबाईल पळवला

सोलापूर, (प्रतिनिधी) : घरातील काही मंडळी झोपलेले असताना फिर्यादी शेरशाह इस्माईल डोंगरी (वय-६५,रा.मंत्री चंडक विहार,आसरा चौक) हे दरवाजा उघडा करून मॉर्निंग वॉकला गेल्यानंतर अज्ञात चोरट्याने त्यांच्या घरातून २५ हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेल्याची घटना ३ नोव्हेंबर रोजी सकाळी घडली मंत्री चंडक विहार आसरा चौक येथे घडली. याप्रकरणी शेरशाह डोंगरी यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल शिर्के हे करीत आहेत.

### किरकोळ कारणावरून मारहाण

सोलापूर, (प्रतिनिधी) : किरकोळ कारणावरून मारहाण केल्याप्रकरणी एकाविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ३ ऑक्टोबर रोजी दुपारी सहारा नगर भाग २ येथे घडली. याप्रकरणी शरीदाबी सलवात शेख (वय-७५,रा. सहारा नगर भाग २) यांनी विजापूर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून हसीना अशपाक शेख (रा.भाग्य देव नगर,कोंढवा,पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी हे राहत्या घरी असताना त्यांची सून हसीना हिने घरातील खोलीला लावलेले कुलूप काढण्यावरून फिर्यादी व मुलगा याला लाथा बुक्क्यांनी मारहाण करून फिर्यादी यांना जमिनीवर ढकलून देऊन लोखंडी सळईने मारून जखमी केले आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. तपास पोलीस करीत आहेत.

### अमोल गायकवाड दोन जिल्ह्यातून तडीपार

सोलापूर, (प्रतिनिधी) : २०२० व २०२४ या कालावधीमध्ये घरफोडी करणे, चोरी करणे यासारखे गुन्हे दाखल असलेल्या अमोल नागनाथ गायकवाड (वय-३१) यास सोलापूर पोलीस आयुक्तालयानं सोलापूर व धाराशीव जिल्ह्यातून दोन वर्षाकरीता तडीपार तडीपार केलंय. त्याच्याविरुध्द सलगर वस्ती पोलीस ठाणेकडून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वयेचा तडीपार प्रस्ताव पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ) यांना सादर करण्यात आला होता. या प्रस्तावाच्या अनुषंगाने पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ) यांनी कार्यवाही करुन अमोल नागनाथ गायकवाड (रा.न्यु मेजर परशुराम शाळा शेजारी, शहा नगर,विमुक्त भटका झोपडपट्टी,सोलापूर) यास सोलापूर व धाराशीव जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता तडीपार केलं आहे. त्यास तडीपारीनंतर पुणे इथं सोडण्यात आलेलं आहे.

# हर्षवर्धन पाटलांच्या विरोधात व्यापारी व्यावसायिक वर्गात नाराजी

## हर्षवर्धन पाटील यांच्या अडचणीत वाढ; इंदापूर शहरात निषेध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी अतुल सोनकांबळे : उजनी पाणलोट क्षेत्रातील इंदापूर करमाळा तालुक्यातील व्यापारी व्यावसायिक व नागरिक यांच्यातील दळणवळण यंत्रणा गावां गावांना जोडण्यासाठी शिरसोडी ते कुगाव पुलाला मंजुरी देण्यात आली. यामुळे दळणवळणाबरोबरच आर्थिक व्यवहार वाढणार आहेत परंतु असे असतानाही माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी या पुलाची सध्या गरज नसल्याचे वक्तव्य केल्याने सध्या इंदापूर तालुक्यातील राजकीय वातावरण तापले आहे व त्यावरून पाणलोट क्षेत्रांतील गावांमध्ये हर्षवर्धन पाटलांविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे. हर्षवर्धन पाटलांच्या अडचणीमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून अनेक कार्यकर्त्यांनी इंदापूर शहरात निषेध नोंदवला आहे.

फेब्रुवारी महिन्यामध्ये व्यापारी संघाच्या वतीने भीमा नदीवर शिरसोडी ते कुगाव हा पूल बांधावा, या साठी इंदापूर शहर व्यापारी संघटनेचे अध्यक्ष भरत शेठ शहा व मुकुंद शेठ शहा यांनी मागणी केली होती.

या मागणीला मान्यता मिळाल्यानंतर शासनाने शिरसोडी ते कुगाव पुलासाठी ३८४ कोटी रुपये मंजूर केले. त्याची घोषणा ही झाली.

हर्षवर्धन पाटील हे जो पर्यंत महायुतीत होते तो पर्यंत ब्रशब्द न काढता मुग गिळून गप्प होते पण भाजपकडून उमेदवारी मिळणार नाही हे स्पष्ट झाल्याने हर्षवर्धन पाटील यांनी तुतारी फुंकली व अध्याप पर्यंत कुगाव पुलाबाबत ब्र शब्दही न काढणारे हर्षवर्धन पाटील उमेदवारी दाखल करण्याच्या दिवशी या पुलासाठी आत्ताच इतका निधी देण्याची गरजच नव्हती. हे काम नंतरही करता आले असते,असे बोलून गेले व या वक्तव्याच्या विरोधात व्यापारीवर्ग व व्यावसायिक नाराज झाले व निषेध नोंदवला.

### लोकांची दिशाभूल करण्याचा प्रकार

**महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक अध्यक्ष संजय सोनवणे म्हणाले की, शिरसोडी ते कुगाव पुलामुळे इंदापूर व करमाळा तालुक्यातील अंतर ७० ते ८० किलोमीटरने कमी होणार आहे. दोन्ही तालुक्यातील पाणलोट क्षेत्रातील ७० पेक्षा जास्त गावांमधील दळणवळण वाढणार आहे. चांगल्या आरोग्य सुविधा लाभणार आहेत; परंतु अशा पद्धतीने चुकीचे वक्तव्य करून लोकांमध्ये चुकीचा संदेश कोणी पसरवण्याचे काम करत असेल तर त्याचा प्रथमतः आम्ही जाहीर निषेध करतो. चांगल्या कामांना चांगले म्हणण्याचे धाडस आपल्यात असले पाहिजे. फक्त टीकेसाठी टीका करणे चालणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.**



त्यामुळे हर्षवर्धन पाटील यांच्या अडचणीत वाढ झाल्याचे स्पष्ट दिसत आहे.

नेतेमंडळी व नागरिकांनी हर्षवर्धन पाटलांच्या वक्तव्याचा समाचार घेत राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब व्यवहारे महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक अध्यक्ष संजय भैया सोनवणे या नेतेमंडळी बरोबर इतर व्यावसायिक नागरिक यांनी हर्षवर्धन पाटलांचा निषेध व्यक्त केला.



# वैभव केंगार आणि राम अनवते यांच्या सुमधुर सुरांनी विठूराया चरणी गायन सेवा संपन्न

## श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांचे वतीने सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी स्थानिक कलाकारांना व्यासपीठ

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांचे वतीने आयोजित सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके साहेब आणि व्यवस्थापक मनोज श्रोत्री साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय सणांचा राजा दिवाळी पाडवा निमित्ताने आज विठूराया चरणी स्थानिक कलाकार वैभव केंगार आणि राम अनवते यांच्या स्वरांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले.त्यांनी सुरुवातीला वारकरी संप्रदायाचा बीज मंत्र जय जय राम कृष्ण हरी गजर करीत विठ्ठल सभा मंडप दुमदुमून गेला.त्यानंतर आवडे हे रूप गोजिरे सगुण.आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा.कानडा राजा पंढरीचा.हरि म्हणा कुणी गोविंद म्हणा. पंढरपूरीचा निळा लावण्याचा पुतळा.पंढरी नगरी दैवत श्रीहरी.माझे माहेर पंढरी मध्यांतरात सतीश कंधारकर यांनीही आदी संतरचना गाऊन शेवटी हेचि दान देगा देवा भैरवीने रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.त्यांना तितकीच सुंदर साथसंगत पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे तबला ज्ञानेश्वर खरात शिवराज पंडीत यांनी करत संपूर्ण कार्यक्रमाचे निवेदन विक्रम बिस्किटे यांनी केले.याचवेळी ह.भ.प.प्रसाद महाराज अंमळनेरकर यांचे शुभहस्ते सर्व कलाकारांचा सन्मान करण्यात आला पहिलीच सायंकालीन संगीत मैफिल पण दिपावली पाडवा निमित्ताने स्थानिक कलाकारांच्या समवेत यशस्वी केली.यासाठी आरती साऊंड सिस्टीम चे भगवान भाऊ मनमाडकर यांचे अनमोल सहकार्य करत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कर्मचारी यांनी अधिक परिश्रम घेतले.

# दीपावली- बालप्रतिपदा पाडव्यानिमित्त श्री विठ्ठल व रूक्मिणी मातेस अलंकार परिधान

## दिवाळी पाडव्या निमित्ताने श्री.विठ्ठल रुक्मिणी माता हिरेजडित अलंकारांनी मढले

सावळें सुंदर रूप मनोहर!

पंढरपूर/प्रतिनिधी : दीपावली बालप्रतिपदा / दिवाळी पाडवा निमित्त दुपारी पोशाखावेळी दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला अलंकार परिधान करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.



श्री विठ्ठलास सोन्याची पगडी, कौस्तुभ मणी, नाम निळाचा, हिऱ्यांचे कंगन जोड, दंडपेठ्या जोड, मोत्याची कंठी दोन पदरी पाचूचा लोलक, मोत्याची कंटी दोन पदरी, मोत्याचा तुरा, शिरपेच लहान, मत्स्य जोड, सोन्याचे पितांबर, नवरत्नाचा हार, हिऱ्यांचे पैंजण, सोन्याचा करदोडा, पुतळ्यांची माळ, मोहरांची माळ, तोडेजोड इ.

श्री रुक्मिणी मातेस जडावाचे मुकुट, जडावाचे हार, नवरत्नाचा हार, जडावाचे बाजूबंद, खड्यांची वेणी, पाचूची गरसोळी, चिंचपेटी हिरवी, गोट, ठुशी, मासपट्टा, शिंदे हार, सोन्या मोत्याचे ताणवड, चंद्र, सूर्य, मोत्याचा कंठा, पेठयाची बिंदी, मन्या मोत्यांच्या पाटल्या, सोन्याचे बाजूबंद, रुळ जोड , पैंजण जोड, वाळ्या जोड, मोठी नथ, सोन्याचा करंडा, छत्रछामर, तारामंडळ, चंद्रहार मोठा, सोन्याची साडी, इत्यादि अलंकार परिधान करणत्यात आलेले आहेत.

तसेच श्री.राधिका मातेस मुकुट, ठुशी नवीन, हायकोल, पुतळ्यांची माळ, जवेचीमाळ व

* श्री.सत्यभामा मातेस मुकुट, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, चिंचपेटी तांबडी, जवामनी पदक इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

बालप्रतिपदा / दिवाळी पाडवा निमित्त श्री.विठ्ठल रुक्मिणी मातेस अनमोल आणि खास ठेवणीतील दागिने परिधान करण्यात आले आहेत, त्यामुळे श्री. विठ्ठल रुक्मिणी मातेचे सुवर्णरूप पाहण्यासाठी देशभरातून हजारो भाविकांनी गर्दी केली आहे तसेच दर्शन घेण्यासाठी आलेल्या भविकांमधून देवाचे सुवर्णरूप पाहून समाधान व्यक्त करण्यात येत असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

# वागदरी येथील मिटकर कुटुंबीयांचा सामुदायिक वाहन पूजा उपक्रम दिपावलीचा आनंद द्विगुणित करणारा : महंत इच्छागिरी महाराज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी /प्रतिनिधी (एस. के.गायकवाड) : वागदरी ता.तुळजापूर येथील मिटकर कुटुंबियांच्या वतीने गावात आयोजित सामूहिक वाहन पूजन उपक्रम हा कौतुकास्पद असून दिपावलीचा आनंद द्विगुणित करणारा आहे, असे प्रतिपादन सोमवारगिरी मठाचे मुख्य महंत इच्छागिरी महाराज यांनी वागदरी येते आयोजित कार्यक्रमात केले.

पुढे बोलताना इच्छागिरी महिराज म्हणाले की धर्म आपणास जिवन जगण्याची जिवन पध्दती शिकवतो धर्म संस्कृती नुसार वहानास लक्ष्मीची उपमा देण्यात येते लक्ष्मी पूजनाच्या निमित्ताने गावातील वहानांची एकत्र पूजन केल्याने एकत्रित सण साजरा केल्याचा आनंद मिळतो.

प्रारंभी छ.शिवाजी महाराज चौकातील मुख्य ध्वजारोहणानंतर गावातील सर्व प्रकारची वाहने वाजत गाजत, फटाक्यांच्या आतिषबाजीत, हलग्याच्या कडकडाटात महादेव मंदिरात एकत्र आणली गेली.राज्य पोलीस प्राधिकरणाचे उमाकांत मिटकर व महाराजांच्या हस्ते मंत्रोच्चारात सर्ववहानाचे सामूहिक वाहन पूजन झाले.सर्व वाहनचालकांना मानाचा पंचा देण्यात आला.महादेव मंदिरात झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात उत्कृष्ट सजावट केलेल्या टुव्हिलर, फोर व्हीलर व इतर अवजड वाहनांना प्रत्येकी तीन हजारांची तीन बक्षीसही देण्यात आली.टू व्हीलर मध्ये मदन चव्हाण,ट्रॅक्टर मध्ये नेताजी वचणे, अवजड वाहनांमध्ये दिगंबर गायकवाड यांनी क्रमांक पटकावला. कार्यक्रमाची बक्षिसे, उपरणे व इतर खर्चाचे प्रायोजकत्व सरपंच तेजाबाई मिटकर यांनी घेतले होते

या कार्यक्रमासाठी जळकोट येथील सचिन कदम चेअरमन, प्रयाग मल्टीस्टेट, श्री.ब्रम्हानंद कदम, संचालक पार्वती कन्या प्रशाला, प्रमोद सावंत, एच.आर. हेड, एमक्यूअर फार्मास्यूटिकल पूणे, श्रीकृष्ण कदम सहशिक्षक, दिनकर कलाल, संचालक ज्ञानदीप क्लासेस,श्रद्धानंद स्वामी मुख्याध्यापक यांची प्रमुख उपस्थिती होती. यांनीच वाहनांचे परीक्षण केले. या कार्यक्रमाला गावातील सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**नितेश बोरकर यांचे प्रतिपादन**

**काळीमातीवर वंदना घेऊन लक्ष्मीपूजन साजरा**

# प्रेरणास्त्रोत असणाऱ्या माणसांना विसरून चालणार नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बाराभाटी/प्रतिनिधी : मानव जातीच्या कल्याणासाठी अनेक महानवांनी व महापुरुषांनी अहोरात्र सामाजिक सुधारणा केल्या आणि घडवून आणल्या आहेत. त्याची जाणीव मानव जातीला असणे महत्त्वाचे आहे. अशातच महात्मा भगवान बुद्ध व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या कार्याची परतफेड करण्यासाठी आपण माणसांनी त्यांच्या पावलावर पाऊल टाकावे. त्यांची कार्यप्रणाली अंगीकृत करुन स्वतःला घडवावे. म्हणून प्रेरणास्रोत असणाऱ्या माणसांना विसरून चालणार नाही. असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते नितेश बोरकर यांनी केले. ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.



यावेळी सेनि. नायब तहसीलदार अशोक लांजेवार यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख पाहुणे अश्विन डोंगरे, संदीप नंदागवळी, कैलास ईस्कापे, अशोक खोब्रागडे, हर्षपाल लोणारे, लोमेश सांगोडे, विश्वरत्न रामटेके, आकाश मेश्राम, स्वप्नील शेंडे आदी बौद्ध बांधव याप्रसंगी प्रामुख्याने उपस्थित होते.

वंचितांचे कैवारी, आरक्षण रक्षक तथा वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अॅड. बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकर दि. ३१ ऑक्टोंबर २०२४ रोजी यांची आरोग्य प्रकृती अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांच्या छातीमध्ये दु:खायला लागते. त्यानंतर पुणे येथील रूग्णालयात ड. प्रकाश आंबेडकर यांना दाखल करण्यात आले. त्यावेळी त्यांच्यावर पुणे येथील रूग्णालयात उपचारादरम्यान छातीमध्ये रक्ताची गुठळी आहे म्हणून डॉक्टरांकडून माहिती मिळाली असता डॉक्टरांनी जिओप्लास्टी करता येऊ शकतो आणि ती जिओप्लास्टी करून पुर्णपणे बरें होऊ शकतात अशी आशावादी माहिती पुणे येथील रूग्णालयातील डॉक्टरांनी दिली.

**सदर माहिती मिळताच सर्व ड. प्रकाश आंबेडकरांना मानणारा समाजवर्ग आरक्षण हा धोक्यात आलेला असून त्यासाठी वंचित, शोसितांचे आरक्षण वाचविण्याकरिता पुढे होऊन लढणारे लढवय्य स्वाभिमानी ड. प्रकाश आंबेडकर यांची खालावलेली आरोग्य स्थिती हि चांगली व्हावी म्हणून दिनांक १ ऑक्टोबर रोजी अर्जुनीमोरगांव तालुक्यातील निसर्गाच्या सानिध्यात वसलेल्या धम्मभूमी काळीमाती पर्यटन क्षेत्र गट ड येथील बुद्ध विहारातील तथागत गौतम बुद्ध व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांसमोर मेणबत्ती लावून दीपप्रज्वलन करण्यात आले. तसेच बुद्ध वंदना आणि पुष्प अर्पण करून ड. प्रकाश आंबेडकरांची खालावलेली आरोग्य स्थिती हि लवकर बरी व्हावी याकरीता यावेळी अभिवादन करण्यात आले.**

यावेळी सामाजिक दशा आणि दिशा अशा समस्या यावरही साधकबाधक चर्चा समात बांधवांनी केल्या. याचे संचालन मुन्नाभाई नंदागवळी यांनी केले.

# कार्तिकी यात्रेनिमित्त श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचे २४ तास दर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दरवर्षी कार्तिकी यात्रेला भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता, यात्रा कालावधीत चांगला मुहुर्त व दिवस पाहून श्रींचा पलंग काढून भाविकांना २४ तास दर्शन उपलब्ध करून देण्यात येते. यावर्षी दिनांक ०४ नोव्हेंबर रोजी चांगला दिवस असल्याने विधिवत पुजा करून सकाळी ७.३० वाजता श्रींचा पलंग काढण्यात येणार आहे. तसेच विठ्ठलाच्या मूर्तीच्या पाठीशी लोड तर रुक्मिणी मातेच्या मूर्तीच्या पाठीशी तक्क्या देण्यात येणार आहे. त्यामुळे श्री विठ्ठल रुक्मिणीमातेचे २४ तास मुखदर्शन, तर २२.१५ तास पदस्पर्श दर्शन सुरू राहणार असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगीतले.

श्रींचा पलंग काढण्यात आल्यानंतर काकडा आरती, पोशाख, धुपारती, शेजारती इ. राजोपचार बंद होवून नित्यपुजा, महानैवेद्य व गंधाक्षता हे राजोपचार सुरू राहतील. दिनांक २० नोव्हेंबर (प्रक्षाळपुजा) पर्यंत २४ तास दर्शन उपलब्ध राहील. तसेच श्री विठ्ठल रूक्मिणीमातेस महानैवेद्य समर्पित करण्यासाठी रू.७,०००/- देणगी देऊन महानैवेद्य सहभाग योजनेत सहभागी होता येते. त्याची दिनांक ०१ जानेवारी, २०२५ ते ३१ डिसेंबर, २०२५ या कालावधीतील नोंदणी देखील सुरू करण्यात आली आहे. त्याबाबतच्या अधिक माहितीसाठी मंदिर समितीच्या ०२१८६ २२४४६६ व २२३५५० या क्रमांकावर व श्री संत तुकाराम भवन, पंढरपूर येथील देणगी कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिले.

## थोडक्यात...

### निवृत्त पोलीस अधिकारी किरु जाधव यांचे निधन



सोलापूर : सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक, समता सैनिक दलाचे ज्येष्ठ कार्यकर्ते केरू रामचंद्र जाधव यांचे सोमवारी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.

सोलापूरच्या धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील कार्यात अग्रेसर असण–रे सेवानिवृत्त पीएसआय केरू रामचंद्र जाधव यांचे सोमवारी ४ नोव्हेंबर २०२४ रोजी पहाटे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते ६३ वर्षांचे होते. केरू जाधव हे समता सैनिक दल, भारतीय बौद्ध महासभा आणि दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे ज्येष्ठ कार्यकर्ते होते. अत्यंत कष्टातून शिक्षण घेत ते पोलीस खात्यात रुजू झाले होते. त्यानंतर प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने सेवा बजावल्याने त्यांना पोलीस उपनिरीक्षकपदी बढती मिळाली होती.

पाच वर्षांपूर्वी ते याच पदावरून सेवानिवृत्त झाले होते. त्याच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगा, सुना, नातवंडे, एक भाऊ असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा न्यू बुधवार पेठेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथील राहत्या घरापासून निघून त्यांच्या पार्थिवावर जुना कारंबा नाका भागातील स्मशानभूमीमध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# पवार साहेबांच्या पाठीत ज्यांनी खंजीर खुपसला त्यांना जागा दाखवणार : अभिजीत पाटील

## हे मत मला नसून पवार साहेबांच्या तुतारीला; अभिजीत पाटलांनी घेतली प्रचारामध्ये आघाडी पंढरपूर तालुक्यातल्या ४२ गावांमध्ये झंजावात प्रचाराला सुरुवात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : ज्यांनी पवार साहेबांच्या पाठीत खंजीर खुपसला, ऐनवेळी ज्यांनी पवार साहेबांची साथ सोडत सत्तेच्या मागे जाणे पसंत केले. शरद पवार यांचा पक्ष आणि चिन्ह हिरा–वून घेण्यासाठी ज्यांनी सह्या केल्या त्यांना जागा दाखवण्याची वेळ आली आहे. येत्या माढा विधानसभा निवडणुकीत तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हाला म तदान करा असे आवाहन अभिजीत पाटील यांनी काल देगाव,बिटरगाव अजूनसोंड येथील सभेत बोलताना केले.





सध्या संपूर्ण राज्यभरात विधानसभा निवडणुकांची रणधुम ाळी सुरू आहे. अशातच अनेक मतदारसंघात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशा थेट लढती पाहायला मिळत आहेत. यातील सर्वात रंगतदार लढत म्हणून माढा विधानसभा मतदारसंघांमध्ये पाहिले जात आहे. या मतदारसंघात सलग सहा टर्म आमदार असणाऱ्या बबनराव शिंदे यांना पंढरपूर येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत पाटील या एका शेतकरी पुत्राने थेट आव्हान देत जेरीस आणून सोडले आहे. तुतारी वाजवणारा माणूस या शरदचंद्र पवार गटाच्या चिन्हावर लढणाऱ्या अभिजीत पाटील यांचा सामना बबनराव शिंदे यांचे पुत्र रणजीत शिंदे यांच्यासोबत होणार आहे. काल अभिजीत पाटील यांच्या प्रचारार्थ बिटरगाव,अजनसोंड व देगाव या गावात गावभेट दौरे आयोजित करण्यात आले होते. अभिजीत पाटील यांच्या बोलण्याच्या शैलीमुळे तसेच तुतारी चिन्हाबद्दल लोकांमध्ये असलेल्या प्रसिद्धीमुळे अभिजीत पाटील यांच्या गाव भेट दौऱ्यांना मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. यावेळी बोलताना अभिजीत पाटील यांनी सत्ताधारी गटाचा खरपूस समाचार घेतला, यावेळी बोलताना ते म्हणाले की माढा मतदारसंघात अनेक विषय जाणिवपूर्वक प्रलंबित ठेवण्यात आलेले आहेत.गेल्या ३० वर्षात सत्ता असूनही यांना शिक्षण आणि आरोग्याचा प्रश्न सोडवता आलेला नाही. सोबतच यांनी ३० वर्षात जेवढा विकास केला नाही तेवढा विकास मला निवडून दिल्यास मी केवळ पाच वर्षात करून दाखवतो असे आवाहनही लोकांना केले. सोबतच ज्यांना पवार साहेबांनी मोठे केलं, ज्यांना गेले तीस वर्षात सत्तेत भागीदारी दिली, त्याच लोकांनी साहेबांची ऐनवेळी साथ सोडत विरोधात जाणे पसंत केले होते. मात्र आता निवडून येणे शक्य नसल्याचे त्यांना दिसू लागल्यानेच त्यांनी तुतारी मिळावी यासाठी पवार साहेबांची उंबरे झिजवले मात्र गेल्या ३० वर्षात कसलाच विकास न केल्यामुळे त्यांना तिथूनही रिकाम्या हाताने परत यावे लागले इथेच त्यांचा पराभव झाला असा घणा–घात त्यांनी आ.शिंदे यांच्यावर केला. पवार साहेबांनी एका सामान्य शेतकरी कुटुंबातील पोराला उमेदवारी देऊन आशिर्वाद दिला आहे.

अनेक वकत्यांनी बोलतांना सांगितले की दिलेला शब्द पाळणारा नेता म्हणून अभिजित पाटील यांची आ–ळख निर्माण झाली आहे. माढा मतदारसंघातील जनता अभिजीत पाटील म्हणजे अशेच किरण म्हणून पाहत आहेत. यावेळी अनेक प्रम ुख मान्यवर तसेच शेकडो ग्रामस्थ उपस्थित होते. अशा मध्येच ४२ गावांमध्ये अभिजीत पाटील यांनी प्रचारामध्ये आघाडी घेतल्याचे दिसून आले.

# आरोही गायकवाड हिच्या पहिल्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रमाने साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/ प्रतिनीधी : गोगांव ता. अक्कलकोट येथील सामाजिक कार्यकर्ते अजित गायकवाड यांनी त्याच्या मुलीच्या पहिल्या वाढदिवस सामाजिक उपक्रम राबवून साजरी करण्यात आले.


यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, माजी सरपंच प्रदीप जगताप, मौला नदाफ माजी सरपंच, गौतम बनसोडे, सौ चंद्रकला गायकवाड पोलीस पाटील, संजय सुरवसे, सूर्यकांत जिरगे, कल्लप्पा बनसोडे, प्रदीप जगताप चंद्रकांत शिंगे बनसोडे यांच्या उपस्थित शालेय म ुलांना महा पुरुषाचे विचाराचे पुस्तक, वही, पेन, साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी बोलताना कमलाकर सोनकांबळे म्हणाले की नेहा डिजिटल सेवा मार्फत अजित गायकवाड यांनी त्याच्या मुलीच्या पहिल्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य व महापुरुषाचे विचाराचे पुस्तक भेट देऊन वैचारिक पिढी घडवत आहे हे कौतुकास्पद आहे वाढदिवसानिमित्त इतर खर्च न करता सामाजिक उपक्रम राबविले आहे भिमनगर म धील नितीन गायकवाड परिवार हा सामाजिक क्षेत्रात वेळोवेळी कौटुंबिक वाढदिवसाच्या माध्यमातून समाजातील शालेय विद्यार्थींना शिक्षण गुणवत्ता सुधारण्यासाठी असे आदर्श उपक्रम राबविले जात असतो, व वंचित घटकातील मुलांना शिक्षणासाठी मदत करत असतात असे वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी व्यक्त केले. यावेळी नितीन गायकवाड, शरणाप्पा बनसोडे, आकाश गायकवाड, मधुमती गायकवाड, परमेश्वर गायकवाड, महेश आलुरे, शांतकुमार बनसोडे, कल्याणराव सोनकांबळे, नामदेव बनसोडे, कांबळे परिवार भुरीकवठे तसेच महिला वर्ग यासह मोठ्या संख्येने जनसमूह उपस्थित होते

# पुणे सोलापूर हायवेवर भिगवण नजिक एसटी बस जळून खाक!

## कोणतीही जिवितहानी नाही; एसटी बस चे मोठे नुकसान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर/प्रतिनिधी, अतुल सोनकांबळे : पुणे सोला–पूर हायवेवर वरती पुण्याच्या दिशेने निघालेली एसटी बस क्रमाक– एमएच १४ बीटी ४३९७ ही बस बंद पडली होती. बस इंदापूर येथून तळेगाव डेपो येथे दुरुस्तीकरिता घेऊन जात असताना भिगवण येथे अच–ानक टायरने पेट घेतल्याने संपूर्ण बस पेटलेली आहे, घटनास्थळी फायर ब्रिगेड, पोलीस स्टाफ व स्थानिकांनी नागरिकांच्या मदतीने आग विझवन्यात आली आहे.

सु दैवाने घडलेल्या घटनेत कोणीही जखमी झाले नसुन एस टी बस चे मोठे नुकसान झाले आहे.

**बंद दाराआड तब्बल पंधरा मिनिटे चर्चा, चर्चेदरम्यान हर्षवर्धन पाटील शहा यांच्या निवासस्थानाबाहेर**

**शरद पवार यांनी बंडखोर प्रवीण माने यांची भेट घेतलीच नाही**

# खा.शरद पवार यांची शहा कुटुंबीयांना भेट; शहा कुटुंबीयांकडुन पवारांचे स्वागत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी इंदापुरात रविवारी पक्षाचे उमेदवार माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांना घेऊन दौरा केला. पक्षातील नाराजी दूर करण्यासाठी आपल्या नियोजित दौऱ्यात मुकुंद शहा, भरत शहा यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन शरदचंद्र पवार यांनी त्यांची भेट घेतली.

**दुसरीकडे बंडखोर उमेदवार जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रवीण माने तसेच जिल्हा बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे यांची मात्र भेट घेतली नाही.**

महाविकास आघाडीचे उमेदवार हर्षवर्धन पाटील व त्यांचे पूत्र राजवर्धन पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राज्याचे सरचिटणीस, पक्ष प्रवक्ते ॲड. राहुल मखरे, तालुकाध्यक्ष ॲड. तेजसिंह पाटील, कार्याध्यक्ष महारुद्र पाटील व इतर पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

औपचारिक गप्पा झाल्यानंतर शरदचंद्र पवार व शहा बंधु यांची बंद खोलीत चर्चा झाली. चर्चेदरम्यान हर्षवर्धन पाटील शहा यांच्या निवासस्थानाबाहेर थांबले होते.

पवार व शहा बंधू यांच्यामध्ये सुमारे पंधरा मिनिटे चर्चा झाली. चर्चे नंतर नियोजित कार्यक्रम ासाठी हर्षवर्धन पाटील यांच्यासमवेत शरद पवार लगेचच तेथून निघून गेले.

हर्षवर्धन पाटील व शहा बंधू यांच्यातील वैचारिक मतभेद व ताणलेले संबंध दुर करण्यासाठी स्वतः शरदचंद्र पवार यांनी पुढाकार घेतल्याचे बोलले जात आहे .

### शरद पवार यांनी बंडखोर प्रवीण माने यांची भेट घेतलीच नाही

**राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटातून बंडखोरी करत इंदापूर विधानसभेच्या निवडणुकीत अपक्ष म्हणून उभे राहिलेले सोनाई उद्योग समूहाचे संचालक प्रवीण माने यांची शरद पवार भेट घेऊन समजूत घालतील अशी जोरदार चर्चा सुरू होती. तसे प्रयत्न देखील हर्षवर्धन पाटील यांच्याकडून सुरू होते. मात्र शरद पवार यांनी इंदापूर दौऱ्यावर आल्यानंतर प्रवीण माने यांची भेट घेतलीच नाही. त्यामुळे प्रवीण माने हे बंडखोरीतून निवडणूक लढणारच हे आता निश्चित झाले आहे.**



शरद पवारांसारख्या ज्येष्ठ नेत्याने त्यांची भेट घेणे, चर्चा करणे ही फार मोठी बाब आहे, त्यामुळे या भेटीला महत्व प्राप्त झालेले आहे. तब्बल पंधरा मि निटे बंद दाराच्या आत भेटी दरम्यान काय चर्चा झाली हे जाणून घेण्याची लोकांची उत्सुकता ही शिगेला पोहा–चली आहे परंतु चर्चा संपताच शरदचंद्र पवार हे तात्काळ पुढच्या दौऱ्या साठी निघुन गेले व पत्रकारांशी संवाद देखील साधला नसल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

